REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# ‘ भालचंद्र वना नेमाडे यांचे समाजीक जीवनातील क्रांतीकारी योगदान ’



कु.वंगारी गीता सदानंद
एम.ए.बी.एड., ( मराठी) सेट उत्तीर्ण 29 मे 2016



## प्रस्तावना –

एखाद्या समस्येचा बारकाईने केलेला अभ्यास म्हणजे संशोधन होय.शिक्षणाच्या प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण होतात. त्या समस्या दूर करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते.

वरिल संशोधन हा भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्य लेखनावर आधारित आहे.

तसेच त्यांनी सामाजिक जीवनात जी मुल्ये रूजविलेली आहेत त्यां मुल्यांचा ही अभ्यास आहे. हे साहित्य समाजासाठी खूप मोलाचे आहे.

शिक्षणाच्या प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण होतात. त्या समस्या दूर करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते.

## गोषवारा– लेखक परिचय

### भालचंद्र वनाजी नेमाडे

भालचंद्र वनाजी नेमाडे (जन्म: २७ मे १९३८, सांगवी, खानदेश) हे परखड लेखन कोणाचीही भीड न ठेवता टीका करणे, आपल्या साहित्याने जनमानस ढवळून काढणे आणि तितक्याच जोरकसपणे सार्वजनिक जीवनात स्पष्ट मते व्यक्त करून प्रसंगी वादाला तोंड फोडणारे प्रसिद्ध मराठी लेखक व टीकाकार आहेत.

### शिक्षण

भालचंद्र नेमाडे हे खानदेशातून मॅट्रिक (१९५५), पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून बी.ए. (१९५९), डेक्कन कॉलेजातून भाषाशास्त्र या विषयात एम.ए.(१९६१) झाले. शिवाय त्यांनी इंग्रजी साहित्यात मुंबई विद्यापीठातून एम.ए. केले आहे. (१९६४) नेमाडे यांना जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून डी.लिट. ही सन्माननीय

**पदवी मिळाली आहे. इंग्रजीचे प्राध्यापक : अहमदनगर (१९६५), धुळे (१९६६), औरंगाबाद. (१९६७-७१), School of oriental and African studies, London (१९७१), आणि १९७४ पासून औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठात व शेवटी ते मुबई विद्यापीठात तुलनात्मक साहित्याच्या अभ्यासाठी स्थापन झालेल्या गुरुदेव टागोर आसनावरून निवृत्त झाले. तसेच नेमाडे हे गोवा विद्यापीठातही इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळले...**
नेमाडे 'वाचा' या अनियतकालिकाचे संपादक होते.

## संशोधन समस्या–

एखाद्या समस्येचा बारकाईने केलेला अभ्यास म्हणजे संशोधन होय.शिक्षणाच्या प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण होतात. त्या समस्या दूर करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते.

वरिल संशोधन हा भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्य लेखनावर आधारित आहे.हे साहित्य समाजासाठी खूप मोलाचे आहे शिवाय कुटुंब,समाज,परिसर या विषयी संस्कार करणे.

संकुचित दृष्टीचा लोप करण्यासाठी वैचारिक जागृती करणे.
समाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.
कुटुंब,समाज,परिसर याविषयी संस्कार करणे.
प्रत्येक व्यक्तींमधील आत्मसन्मान जागृत करणे.

प्रस्तूत संशोधन अभ्यास संशोधन करत असतांना भालचंद्र नेमाडे यांच्या लेखन साहित्याचा व विविध साहित्यप्रकारांचा अभ्यास केलेला आहे.

## अभ्यासाचे महत्व

नेमाडे यांचे लेखनसाहित्य हे केवळ मनोरंजनात्मक नसून समाजोपयोगी आहे. त्यांच्या प्रत्येक लेखनसाहित्यातून कुठले ना कुठले समाजमुल्य समाजावर बिंबविले गेलेले आहेत.

काव्यसौंदर्याची, कादंबरीची अनुभुती देणे, वात्सल्य, माया, जिव्हाळा, मातृप्रेम या भावनात्मक मूल्यांचा परिचय व अध्ययनानुभुती देणे. हे नेमाडे यांच्या साहित्यलेखनाचे वैशिष्टये आहेत.

तंत्रविज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाची विलक्षण प्रगती झाली. सुख साधनात भर पडली व भौतिक सुखांचा लाभ झाला. बुध्दिचा जसा व जितका विकास होत गेला तसा व तितका मनाचा झाला नाही. भौतिक विकासाबरोबरच ज्या प्रमाणात नैतिक मुल्यांचा विकास व्यक्तीगत, सामाजिक व राष्ट्रीय जीवनात व्हायला हवा होता तो झालेला नाही. यासाठी नेमाडे यांचे साहित्य लेखन प्रकार प्रत्येक व्यक्तीच्या मनात उच्च नैतिक मुल्यांची रूजवणे ते अप्रत्यक्षपणे करीत असतात.

## अभ्यास उद्दिष्टे

- नेमाडे यांची खरी ओळख कांदबरीकार म्हणून आहे.
- टीकास्वयंवर हा त्यांचा समीक्षापर ग्रंथ या क्षेत्रात मानदंड ठरला आहे.
- साहित्याची भाषा हा त्यांचा ग्रंथ छोटा असला तरी भाषेच्या अभ्यासकांना तो उपयुक्त ठरेल असा आहे.
- तत्कालीन रूढ कादंबरीची चौकट संकल्पना आणि संरचना नाकारून कादबंरी या वाड्.मयप्रकाराचे लवचिक आणि खुले स्वरूप मराठी रसिकांसमोर धीटपणे ठेवले आहे.
- चंद्र,चांदण्यात आणि प्रेम प्रकरणात अडकलेली मराठी कादंबरी त्यांनी खऱ्या अर्थाने मुक्त केली. माजघरातील मराठी कादंबरीला रस्त्यावर आणून भटकायला लावले.
- नेमाडेंनी रूढ शैलीत क्रांतीकारी बदल घडवून आणले.पूर्वीचे लेखन पध्दती मोडीत काढली. पारंपारिक व्याकरणाचे नियमही त्यांनी कालबाहय ठरविले.
- भाषेत प्रवाहीपणा आणण्यासाठी अवतरण चिन्हे काढून टाकली.

- पात्रानुसार संवादाची भाषा ठेवली.
- मानवी मनाच्या खोलात रूजलेले विचार सहजपणे बाहेर काढले अन् ते निवेदनातून वाचकापर्यंत पोहोचविले.
- कोसला पर्यंतची  भाषा ही प्रामुख्याने निवेदनासाठी यायची. इथे ती अनुभवाची भाषा म्हणून आली आहे.
- नेमाडेंनी शैली संदर्भातील रूढ कल्पनांना नाकारून स्वतःची स्वतंत्र अशी शैली तयार करून पुढील अनेक दशकासाठी नवोदितांना लेखनाचा मार्ग सुकर करून दिला. अस्तित्ववादी कादंबरीचे महत्व नेमाडेंनीच पटवून दिले. तसेच देशीवादाचा आग्रहही त्यांनीच धरला. या सर्व गोष्टी विचारात घेता नेमाडे या कालखंडातील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार समजले जातात ते योग्यच आहे.
- कोसला मध्ये पांडुरंग सांगवीकर या सामान्य माणसाच्या मनातील स्पंदने टिपली आहेत. एका पंचवीषीतील तरूणाने  आपल्या आयुष्यातील पाच–सहा वर्षाच्या अनुभवांचे प्रामिणकपणे केलेले कथन हा कोसला या कादबंरीचा आषय आहे. ही एका संवेदनशील तरूणाची आत्मकथा आहे. त्याने अस्तित्वासाठी केलेल्या झगडयाची कहाणी आहे.ही एका संवेदनशील तरूणाची आत्मकथा आहे. त्याने अस्तित्वासाठी केलेल्या झगडयाची कहाणी आहे.पिता–पुत्र या दोन पिढयातील संघर्ष त्यात आहे. महाविद्यालयीन जीवनाचे वास्तवपूर्ण रेखाटन आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या पोकळेपणाचे अन् किडकेपणाचे नव्या दृष्टीने केलेले निरीक्षण आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातील संबंधाचा शोध आहे महणूनच कोसला ही नव्या युगाची नांदी आहे असे म्हंटल्यास चुकीचे ठरणार नाही. कोसला नंतर प्रसिध्द झालेल्या बिढार,हूल,जरीला,झूल या चारही कादंबऱ्यामधून शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्ट आचरणाचे चित्रण मोठया समर्थपणे चित्रित केले आहे.

### भालचंद्र नेमाडे यांची परखड मते

भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याच्या निमित्ताने त्यांनी मातृभाषांवरील इंग्रजीचे वाढते प्रस्थ, मराठीचा अभिजात भाषेचा दर्जा, हिंदुत्व, साहित्य संमेलन अशा अनेक विषयांवर आपले परखड विचार मांडले.

- मराठीला तेराव्या शतकात अडकून ठेवले आहे. हे बदलले पाहिजे. गोंड , कोरकू, भिल्ल, कातकरी हे मराठीच आहेत. त्यांची भाषा ही शुद्धच आहे.
- इंग्रजी भाषा हटवणे हे ज्ञानपीठाहून मोठे आहे. इंग्रजी चांगली आहे, ती आली पाहिजे मात्र, इंग्रजी माध्यमामुळे ती बदलते. मराठी माध्यमातले लोक जास्त चांगले इंग्रजी बोलतात, जास्त चांगले इंग्रजी लिहितात. महात्मा गांधी, टागोर, जगदीशचंद्र बोस हे मातृभाषेतूनच शिकले व मोठे झाले. महाराष्ट्रातल्या महाविद्यालयांतले जे इंग्रजीचे प्राध्यापक आहेत ते सगळे मराठी माध्यमातले आहेत. भाषा ही नुसती शाळेत शिकली की झाले असे होत नाही, तर ती माणसाच्या मेंदूत, समाजात असावी लागते.
- इंग्रजी माध्यमातला माणूस इंग्रजीचाही प्राध्यापक होऊ शकत नाही. मुंबई विद्यापीठात पोस्ट ग्रॅज्युएशनला सगळे खेड्यातून आलेले आहेत. इंग्रजीत ५००-६०० वर्षात एकही महाकाव्य झालेले नाही.
- हिंदुत्व हा जगप्रसिद्ध असा शब्द, सर्वसमावेशक अशी संस्कृती आहे; परंतु धर्म करून संकुचित अर्थ करणे हे हिंदुत्वाला खूप मारक आहे. ही हिंदू संस्कृती आहे, तिचा धर्माशी संबंध नाही. हे खूळ इंग्रजांनी आणले.
- साहित्य संमेलनाला चांगला लेखक चुकून जातो. संमेलनात जे साहित्यिक असतात ते चांगले साहित्यिक असतात का यावर प्रश्नचिन्ह आहे. कधी कधी चुकून एखाद्या कार्यक्रमाला जातो तसा चुकून चांगला लेखक साहित्य संमेलनाला जातो.

नेमाडे यांच्या प्रत्येक साहित्यलेखनाचा अभ्यास खूप महत्वपूर्ण आहे.

प्रत्येक साहित्यप्रकार हा मूल्यसंस्कारांशी संबधित आहेत. जसे नैतिकमुल्ये,कौटुंबिक मुल्ये,हास्यमुल्ये,सामाजिक मुल्ये इ.अनेक मुल्यांचे संस्कार मनुष्यावर होतात जेव्हा आरती प्रभुंचे साहित्य वाचले जाते.

## संशोधन कार्यप्रणाली

प्रस्तूत संशोधन कार्यकरत असतांना दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे.व्यक्तिगत प्रालेख व सार्वजनिक प्रालेख अषांचा उपयोग केला. तसेच व्यक्तिगत प्रालेकांमध्ये आत्मचरित्रे,दैनंदिनी, पत्रे,संस्मरणे लेख इ. तर सार्वजनिक प्रालेखांमध्ये अभिलेख, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, वार्षिके विविध संघटनांची प्रकाशने, विशिष्ट वृत्त, सांख्यिकीय प्रकाशने इ.समावेष होतो.

### कवितालेखन

भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यांच्या कविता 'छंद', 'रहस्यरंजन', 'प्रतिष्ठान', 'अथर्व' यामधून प्रसिद्ध झाल्या होत्या.

देखणी हा त्यांचा कविता संग्रह प्रसिद्ध आहे.

### कादंबऱ्या

- कोसला(१९६३)
- जरीला(१९७७)
- झूल (१९७९)
- बिढार (१९६७)

### कविता संग्रह

- देखणी कोकणीतसुद्धा अनुवादित झालेला काव्यसंग्रह), अनुवादक(रमेश वेळुसकर-
- मेलडी (१९७०)

### समीक्षा

- टीकास्वयंवर
- तुकाराम
- मुलाखती
- साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण
- साहित्याची भाषा
- सोळा भाषणे

### इंग्रजी

- इंडो र्सट्र लेक्च -ॲँग्लियन रायटिंग्ज -
- नेटिव्हिजम
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडी

### नेमाडे यांच्या विषयी आणि त्यांच्या साहित्याविषयीचे लेख

### एका असंबद्ध लिखाणाचा पंचनामा

- खंडेराव, अडगळ आवरत जा, राव!
- नेमाड्यांचा लेखकराव होतो तेव्हा

- मेलडी भालचंद्र नेमाडे -
- रसग्रहण स्पर्धा: 'हिंदू' – भालचंद्र नेमाडे
- भालचंद्र नेमाडे...साहित्याचे समृद्ध जाळे :
- 'कोसला'कार ते 'हिंदू'कार
- भालचंद्र नेमाडे यांची मुलाखत
- किशोर सानप भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी :
- किशोर सानप भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा :
- देवानंद सोनटक्के : समीक्षेचा अंतःस्वर, पद्मगंधा प्रकाशन पुणे.

चित्रपट

दिग्दर्शक अक्षय इंडीकर यांनी नेमाडेंच्या जीवन व साहित्यावर आधारित "उदाहरणार्थ नेमाडे". हा मराठीतला पहिलावहिला डॉक्युफिक्शन चित्रपट काढला आहे. (डॉक्युफिक्शन म्हणजे विचाराल तर डॉक्युमेंट्री म्हणजेच माहितीपट आणि कल्पना यांना एकत्र साधून केलेलं सिनेचित्रण.) चित्रपट दीड तासाचा असून तो २७ मे २०१६ रोजी प्रदर्शित झाला.

### नमुनानिवड

कोसला(१९६३) पहिली कादंबरी :

कोसला हे पुस्तक त्यांच्या वयाच्या २५व्या वर्षी प्रकाशित झाले. कोसला ही पांडुरंग सांगवीकर या खेड्यातून आलेल्या व पुण्यात शिकणाऱ्या तरुणाची आत्मकथा आहे. ही कादंबरी सर्वसाधारण मराठी वाङ्मयप्रवाहाच्या बाहेरील कलाकृती मानली जाते.

'कोसला' चा नायक पांडुरंग सांगवीकर या नैतिकतेच्या आधारावर बाप, गाव, सगेसोयरे यांना नाकारतो. अशा व्यक्तिमत्त्वावरील कथा असलेली 'कोसला' ही कादंबरी प्रस्थापित कांदबरीचे स्वरूप, विषय, भाषाशैली, संकल्पना अशा सर्वांना दूर ठेवणारी ठरली. 'कोसला' ने मराठी कादंबरीला नवी दिशा देत ती अधिक खुली व लवचीक केली. आत्मचरित्रात्मक मांडणी हे नेमाडेंच्या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे.

कोसलानंतर

कोसलाच्या यशानंतर नेमाडेंनी बिढार (१९६७), जरीला (१९७७) व झूल(१९७९) या "चांगदेव पाटील" या काल्पनिक नायकाच्या जीवनावरील कादंब-या लिहिल्या. हिंदू नावाची कादंबरी नेमाडे लिहिली असून ती जुलै १५, इ.स. २०१० ला पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाली. कादंब-याशिवाय त्यांचे 'देखणी' आणि 'मेलडी' (१९७०) हे काव्यसंग्रहही प्रसिद्ध आहेत. या कवितासंग्रहातील कवितांची हिंदी आणि इंग्रजी भाषांतरे प्रकाशित झाली आहेत. १९६० नंतरचे मराठीतील श्रेष्ठ लेखक अशी भालचंद्र नेमाडे यांची प्रतिमा आहे.

नेमाडेंनी कादंबरी, कविता व समीक्षा ग्रंथांची निर्मिती या सर्व क्षेत्रांत साहित्यिक कामगिरी केली. रंजनवादी मूल्यांना कडाडून विरोध करतानाच परंपरेविषयी चिकित्सक असण्याकडे त्यांचा कल आहे. मराठीवरील इंग्रजी साहित्याचा प्रभाव, शैलीशास्त्रीय दृष्टीने अभ्यास ही वैशिष्ट्ये असणा-या नेमाडेंनी इंग्रजीतूनही साहित्यनिर्मिती केली. व "साहित्याची भाषा' हे त्यांचे भाषाविज्ञानविषयक तात्त्विक स्वरूपाचे पुस्तक वाचकांना वेगळी दृष्टी देते.

### नेमाड्यांचा देशीवाद

सातत्याने देशीवादाची संकल्पना मांडणा-या नेमाडे यांनी त्याचा आग्रहही धरला. जागतिकीकरणाचा रेटा वाढला आणि देशीवादाला गती आली. ईशान्येत जंगले टिकून आहेत ती देशीवादाने आणि पुण्या-मुंबईचा जंगल झाला तो जागतिकीकरणाने, अशी त्यांची भूमिका होती. पाश्चानत्त्यांच्या नादी लागून त्याचे अंधानुकरण करण्याऐवजी आहे त्या व्यवस्थेत सुधारणा करून त्या अधिक विकसित कशा करता येतील, यावर त्यांनी भर दिला.

सर्व क्षेत्राप्रमाणे साहित्यातही पाश्चारत्त्य प्रवाह शिरले असताना नेमाडेंनी त्यावरच प्रहार केल्यानंतर इतर लेखक अंतर्मुख झाले आणि त्यांनी आपल्या लेखनाची कूस बदलली. नेमाडेंनी आपल्या साहित्यात बोलीभाषेला अधिकाधिक वाव दिला. कोकणी, गोंयची, हिंदीमिश्रित उर्दू आणि वैदर्भीय या बोलींमध्ये त्यांनी कविता लिहिल्या.

### हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ

'हिंदू' लिहिण्यापूर्वी नेमाडे यांनी तब्बल ३० वर्षे लेखन विश्रांती घेतली होती. 'हिंदू' प्रकाशनापूर्वीच भरघोस चर्चा घडवणारी ठरली. 'हिंदू'वर प्रचंड टीकाही झाली आणि भरभरून स्वागतही झाले. पिढ्यांमागून आलेल्या पिढीमध्येही लोकप्रियता टिकवून असलेले नेमाडे हे त्यांच्या साहित्यातील बंडखोर वृत्ती, साक्षेपी आणि परखड लेखन, वस्तुनिष्ठतेला अग्रक्रम आणि लोकभाषेतून साहित्यरचना यामुळेच वाचकांना आपलेसे वाटतात

### संशोधन अभिप्राय

नेमाडेंनी लिहिलेले साहित्य लेखन **संग्रह रसिकांना खुप भावले .त्यांनी** लिहिलेल्या **अनेक** कथा,कादंब–या,कविता, **गीतं आजही मनात घर करुन आहेत, याचं कारण म्हणजे** नेमाडयांच्या **लेखनात तरलता, वेधकता असल्यामुळे रसिक मनांची पकड घेणं त्यांनी साधले होते;**

### निष्कर्ष

वरिल साहित्य लेखनावरून असे कळते की, भालचंद्र नेमाडे केवळ मनोरंजनात्मक लेखन केले नसून सर्व थरातल्या लोकांना आवश्यक परिपूर्ण लेखन साहित्य उपलब्ध करून दिले जे जीवनोपयोगी, समाजउपयोगी आहे.

### संदर्भ

भालचंद्र नेमाडे यांची – विकीपीडीया.
भालचंद्र नेमाड–हिंदू, देखणी
भालचंद्र नेमाडे–निवडक मुलाखती
भालचंद्र नेमाडे–सोळा भाषणे
इंटरनेट गुगलगुरू.